**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

## प्रेसनोट दिनांक – २८/०७/२०२४

**दि. २७/०७/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- देहुरोड ३५६/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३३१(१)(२) (३),३०५ प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. २५/०७/२०२४ रोजी २१.३० वा. ते दि २६/०७/२०२४ सकाळी ०७.१५ वा चे दरम्यान सेंजजॉर्स शाळे समोर, थॉमस कॉलनी, मामुर्डी, फिर्यादी यांचे राहत्या घरातुन
गुन्हा दाखल :- दिं.२७/०७/२०२४ रोजी चे ०१.५२ वा
फिर्यादी :- प्रणाली महेश तेलगू, वय २७ वर्षे व्यवसाय नोकरी, रा. सेंजजॉर्स शाळेसमोर, थॉमस कॉलनी, मामुर्डी, पुणे मो.नं. ९१४६८६४४६९
आरोपी :- अज्ञात चोरटा
तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे घराचा दरवाजा कडी कुलुप लावून बंद असताना कोणीतरी अज्ञात चोरटया फिर्यादी यांचे घराच्या लोखंडी दरवाज्याचा कोयडा कशाने तरी कापून घरामध्ये प्रवेश करुन बेडरुम मधिल कपाट उघडून त्यामध्ये ठेवलेले २,२९,४००/- रू किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम फिर्यादी यांचे संमतीशिवाय मुद्दाम लबाडीचे इराद्याने स्वताःचे आर्थीक फायदयाकरीता घरफोडी करुन चोरुन नेला आहे.
त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि राठोड ९०२८३८५८४१

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ८३७/२०२४, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३१६ (२), ३१८(४) प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. १६/०६/२०२४ रोजी १३.०० वा ते दि १६/०७/२०२४ रोजी २०.०० पर्यंत रहाटणी पुणे येथे
गुन्हा दाखल :- दि. २७/०७/२०२४ रोजी १८.४६ वा.
फिर्यादी :- पुरूष फिर्यादी वय-४५ वर्ष धंदा- नोकरी रा. रहाटणी पुणे मोबा नं. ९८८११०७५४५, ९६८९८३५३२५
आरोपी :- शिवांगी आगरवाल मोबा.नं. ९९८१५१८२९५, ८२६९९८६९१८ ) पुर्ण नाव पत्ता माहित नाही **आरोपी अटक नाही**
तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी हिने मो.नं. ९९८१५१८२९५, ८२६९९८६९१८ या व्हाटसअप नंबरने फिर्यादी यांना मेसेज करुन मी एमएमसी कंपनी मध्ये काम करत आहे कंपनीचे महेश सी गुप्ता यांची मी असिस्टंट आहे असे सांगुन तुम्हाला चांगला स्टॉक दाखवला जाईल तुम्हाला दररोज ट्रेडींगमध्ये ५ टक्के फायदा होईल सांगुन एमएमसी ग्लोबल सिक्युरिटी बी -२ हा ग्रुप जाईन्ट करण्यास सांगुन त्यामध्ये अपर सिर्कीट व ब्लॉक ट्रेडींग बाबत माहीत देवुन एसएमसी इऩ्स्टीटयुशनल अकाऊंट ओपन करण्यास सांगुन फिर्यादी यांना https://bouxzX.HR33JO.com/jKMY09 ही लिंक पाठवुन आयपीओ ( Effwa Infra & Research SME ) मंजुर झाले असे दाखवुन एसएमसी इऩ्स्टीटयुशनल अकाऊंट फिर्यादीचे नावाचे लोन दाखवुन बनावट एसएमसी इऩ्स्टीटयुशनल अकाऊंट ७१,७६,०००/-रु. नफा दाखवुन १,३७,३६,०००/-रु. एवढी रक्कम एसएमसी इऩ्स्टीटयुशनल अकाऊंटला जमा दाखवुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक करण्याच्या उद्देशाने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन आर्थिक आमिष दाखवुन त्यांच्या वेगवेगळया बँक अकाऊंटवर एकुण ६०,००,०००/-रु. घेवुन फिर्यादीस कोणतेही रक्कम रिटर्न न देता फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि सुर्यवंशी ७२७६६४५९८७

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- दिघी ३२३/२०२४ भादवि कलम ४२०, ४०६ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- माहे नोव्हेंबर २०१९ नक्की ता वेळ माहित नाही ते दि ०८/०४/२०२४ रोजी दरम्याण मौजे चऱ्होली बु ता हवेली जि पुणे गावचे हद्दीत जमीन गट नं ३१८/१ या मिळकतीमध्ये सुरु असलेल्या भाभुश्री नंदन प्लॉटींगमध्ये

गुन्हा दाखल :- दि. २७/०७/२०२४ रोजी १६.५० वा.

फिर्यादी :- रंजीत कैलास घुले वय ३६ वर्षे व्यवसाय नोकरी रा माणिक पार्क रेसीडन्सी बी ३०१ बोपखेल पुणे

आरोपी :- १) नितीन प्रकाश पठारे रा कळस पुणे मुळ रा पठारेमळा चऱ्होली बु ता हवेली जि पुणे **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने फिर्यादी व त्यांचा भाउ संतोष कैलास घुले यांना खरेदीखत करुन लिहुन देण्याचे मान्य व कबुल करुन त्याची विसापावाती करुन लिहुन देण्याचे मान्य व कबुल करुन तशी विसार पावती करारनामा नोटरी वकील चंद्रबोधी डी राजवंत यांचे समक्ष नोटरी सिरीयल नंबर ९२३/२०२२ अन्वये दिनांक २०/१०/२०२२ रोजी इसम नामे नितीन प्रकाश पठारे सध्या रा. कळस पुणे मुळ रा. पठारेमळा, चूहोली बु. ता. हवेली जि. पुणे यांनी लिहुन देवुन सदर प्लॉट आम्हांस खरेदी देण्याच्या बहाण्याने वेळोवेळी विश्वासाने आमचेकडुन रोख स्वरूपात व ऑनलाईन बॅकींगद्वारे एकुण १७,००,०००/- रूपये स्वीकारून सुध्दा सदर प्लॉट रितसर खरेदीखत करून लिहुन न देता सदर प्लॉट नंबर १८ व १९ हे फिर्यादीचे संमतीशिवाय परस्पर महिला नामे इसरत सल्लाउद्दीन खान रा.कळस पुणे यांना दुयम निबंधक हवेली नंबर ७ यांचे कार्यालयात खरेदीखत दस्त नंबर २५६७४/२०२३ अन्वये विक्री केल्याचे आमच्या लक्षात आल्यानंतर फिर्यादी यांनी आरोपीकडुन प्लॉट विकत देण्याचे बहाण्याने स्वीकारलेले पैसे परत मागीतले असता, त्यांनी दिनांक ०८ जानेवरी २०२४ रोजी तडजोडीअंती एकुण २३ लाख रूपये चेकद्वारे देण्याचे मान्य करून इसम नामे नितीन प्रकाश पठारे यांनी त्यांचे युनियन बॅंक, शाखा विश्रांतवाडी पुणे या बॅंकेचे चेक नंबर १२२५४२७७ या नंबरचा चेक माझे नावे एकुण ११,५०,०००/- रूपयाचा दिनांक ०८/०४/२०२४ रोजीचा पीडीसी चेक दिला होता. तसेच भाऊ नामे संतोष कैलास घुले याचे नावे सुध्दा एकुण ११,५०,०००/- रूपयाचा पीडीसी चेक क्रमांक १२२५४२७८ या नंबरचा चेक दिनांक ०८/०४/२०२४ रोजीचा नितीन प्रकाश पठारे यानी दिलेला होता. सदरचे दोन्हीही चेक आम्ही युनीयन बॅंक ऑफ इंडिया, विश्रांतवाडी शाखा या बॅंकेत ते चेक वटविण्यासाठी जमा केले असता, आरोपी याने स्वतः युनीयन बॅंक ऑफ इंडिया, विश्रांतवाडी शाखा या बॅंकेत दिनांक ०८/०४/२०२४ रोजी जावुन जाणीवपुर्वक फिर्यादीची फसवणुक करण्याचे हेतुने सदर चेक स्टॉप करून आर्थीक फसवणुक केलेली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि अंभोरे ८४५४०११०५२

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ४७५ /२०२४ भारतीय न्याय संहिता २८१, १०६, १२५(बी) मोवाका कलम १८४,१३४ अ,ब प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. २५/०७/२०२४ रोजी ०६.२३ वा चे सुमारास मौजे महाळुंगे गावचे हददीत एच.पी. चौक ते इंडोरन्स चौक जाणारे रोडवर भारत पेट्रोलपंपचे समोर ता.खेड जि.पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.२७/०७/२०२४ रोजी २१.१६ वा.

फिर्यादी :- धनाजी सपत केंजळे, वय ५२ वर्षे धंदा-शेती, रा. काठापुर ता. कोरेगाव जि. सातारा

आरोपी :- टाटा कंपणीचा ट्रक गाडी क्र एम एच २० सी टी १२३७ या वरील चालक नाव पत्ता माहीत नाही

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा भाचा नितिन अंबरनाथ निकम वय-३४वर्षे रा. येलवाडी ता.खेड जि.पुणे मुळ रा. इंदोली ता.कराड जि.सातारा हा राहते घर ते महींद्रा कंपनी निघोजे हा हेल्मेट डोक्यास घालुन त्याचे ताब्यातील मोटार सायकल नं.एमएच १४ जे.सी.४८२९ हि वरुन कंपनीत कामावर जात असताना त्याचे पाठीमागुन येणारा टाटा कंपणीचा ट्रक गाडी क्र एम एच २० सी टी १२३७ यावरील चालक नाव पत्ता माहीत नाही यांने त्याचे ताब्यातील ट्रक हायगयीने, अविचाराने, भरधाव वेगात चालवुन मोटारसायकल ला पाठीमागुन धडक देवुन अपघात करुन त्यांचे पोटाला, छातीला गंभीर दुखापती करुन त्याचे मरणास कारणीभुत झाला, तसेच मोटार सायकल चालक यास जखमी अवस्थेत सोडून उपचारकामी न नेता पळून गेला आहे. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि शिंदे ७५०६९७४७९०

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- भोसरी ४६४/२०२४, भारतीय न्याय संहिता कायदा सन २०२३ चे कलम २८१ , १०६(१), १२५(ए),

| | | |
|---|---|---|
| | | १२५(बी), मो.व्हि.ॲक्ट कलम १३२(१)(क) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२६/०७/२०२४ रोजी सायं ७/३० वा. चे सुमा. नाशिक पुणे हायवे रोड, कुदळे मारूती सुझुकी सर्विस सेंटर गेट समोर, भोसरी पुणे येथे रोडवर |
| गुन्हा दाखल | :- | दि.२७/०७/२०२४ रोजी २०.४९ वा. |
| फिर्यादी | :- | श्री ओमकार ज्ञानेश्वार झांजले वय २९ वर्षे, धंदा व्यवसाय, रा. सिद्धीविनायक कॉलणी, घर नं. ३, डिपी रोड, कोथरूड पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात वाहन चालक |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील अज्ञात वाहनावरील अज्ञात चालक आरोपी याने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे, वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून मानवी जीवीतास धोका होईल अशा रितीने चालवून फिर्यादी यांचे साडू दिलीप निवृत्ती बवले यांचे  हिरो होन्डा स्पेन्डर मोटर सायकल नं. एम.एच.१४/ए.जे.२२९८ हिस  धडक दिल्याने त्यांचा अपघात होवून ते राजमाता उड्डाणपुलाचे खाली असलेले डिव्हायडरवरील सळयीवर पडून त्यात गंभिर जखमी होवून उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला आहे. तसेच सदर वाहन चालक अपघातस्थळी न थांबता चालकाचे कोणतेही कर्तव्य न बजावता तो तेथून पळून गेला आहे म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि शेख ७०२१५३८७३४ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ८३८/२०२४, भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ३१६(२) ३१९(२),३१८(४),३(५) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. १३/०६/२०२४ रोजी १०.०० ते दि ०२/०७/२०२४ रोजी १८.०० दरम्यान मी माझे कल्पतरु एक्सक्लुझिव्ह सोसायटी, झनित टावर, फ्लॅट नं.११०६, न्यु डि पी रोड, वाकड, पुणे. याठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि. २७/०७/२०२४ रोजी १८.४६  वा. |
| फिर्यादी | :- | निलेश भानुदास रडे, वय ४९ वर्षे, धंदा- नोकरी, रा. कल्पतरु एक्सक्लुझिव्ह सोसायटी, झनित टावर, फ्लॅट नं. ११०६, न्यु डि पी रोड, वाकड, पुणे. |
| आरोपी | :- | १) अनोळखी मो.क्र. ९८३९७२५५१० धारक महिला प्रियंका कुमारी, रिलेशनशिप मॅनेजर, आस्था इन्व्हेसमेंट कंपनी, तसेच त्यांचे<br>२) आस्था कस्टमर क्र. ८४३२१९७३१६ अनोळखी धारक व ३) इतर मो.क्र. ७५४९३७८७५४ धारक अर्जुन सिंग  पुर्ण नाव-पत्ता माहित नाही.   **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी यानी फिर्यादी यांचे मोबाईल क्रमांकावर वेळोवेळी संपर्क करुन, शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करुन चांगला नफा कमविण्याचे अमिष दाखवुन त्यासाठी आस्था सिक्युरीटीज हे ॲप हे डाऊनलोड करायला लावुन, त्यामध्ये शिवालिक पावर कंट्रोल लिमिटेड या कंपनीच्या आयपीओ/शेअर खरेदी करावयास लावुन, त्यासाठी एकुण १,६३,००,०००/- (एक कोटी, त्रेसस्ट लाख रुपये) वेगवेगळ्या बँक खात्यावर भरावयास लावुन, फिर्यादी यांना कोणत्याही प्रकारचा नफा अथवा भरलेली रक्कम परत न करता फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि नाळे ९०१११८१९९९ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड  ३५५/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५)महा पो का. क. १४२,३७(१)(३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२६/०७/२०२४ रोजी चे  २१.४५ वा.  देहुरोड कॅन्टाँनमेंट हॉस्पीटल कडुन पाण्याच्या टाकीकीडे जाणारे रोडचे उजव्या बाजुस |
| गुन्हा दाखल | :- | दिं.२७/०७/२०२४ रोजी ०१/२९ वा |
| फिर्यादी | :- | श्यामसुंदर वैजनाथ गुट्टे पोशि २५७१,वय-३६ वर्षे  नेमणूक गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय मोनं-९३७०५०९३१६ |
| आरोपी | :- | १) करण अरुण सकट वय. २० वर्षे रा. पाण्याच्या टाकी मागे गांधीनगर देहुरोड ता. हवेली जि. पुणे<br>२)रोहीत बजरंग सकट वय- २१ वर्षे रा. पाण्याच्या टाकी मागे गांधीनगर देहुरोड ता. हवेली जि. पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील तडीपार आरोपी याने मा. पोलीस उप आयुक्त सो. परिमंडळ ०२ पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी ०१ वर्षा करीता तडीपार केला असतानां सुध्दा तडीपार आदेश रद्द किंवा निवास्थानी येण्याची परवानगी न घेता जाणुनबुजुन सदर आदेशाचे उल्लंघन केले आहे तसेच आरोपी १ व २ याने |

| | | |
|---|---|---|
| | | लोकांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी आपले कब्जात १,०००/- रू किमतीचे २ कोयते लोखंडी धारदार हत्यार अनाधिकाराने, विनापरवाना, बेकायदेशीर जवळ बाळगला असताना मिळुन आले असुन त्यांनी मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयीन पोलीस नोटीस महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये आदेशाचे उल्लंघन केले |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा पवार ७६२०५९६५२९ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड ३५७/२०२४ विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १४, १४(a),१४(b),१४(C) पारपत्र अधि १९६७ चे कलम १२, पारपत्र, भारतात प्रवेश) १९५० चे कलम ३ (अ) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२६/०७/२०२४ रोजी १३.०० वा.एम बी कॅम्प व देहूरोड |
| गुन्हा दाखल | :- | दिं.२७/०७/२०२४ रोजी ०३/२७ वा |
| फिर्यादी | :- | अशोक गेणू पेरणेकर, वय ५६ वर्षे धंदा नोकरी, सहा. पोलीस उप निरीक्षक, नेमणुक दहशतवाद विरोधी पथक, पुणे युनिट महाराष्ट्र राज्य मोनं-९०११०८२७४७ |
| आरोपी | :- | १) शाहीद उर्फ सोहिददुल उर्फ स्माईली कालुस्लाम शेख, शाहीद इस्लाम वय ३५ रा घर नं ८६ एम बी कॅम्प मदीना मजीद जवळ पुणे मुळगांव राकाई शहर, बुथीदंग, तुंगबजार, पोलीस ठाणे तुंगबाजार, म्यानमार २) मुज्जमील मोहमद अमीन खान वय ४३ रा. पंडित चाळ, गांधीनगर, देहूरोड, मुळगांव नांगचंग, तहसील मगदू, जि. रेकॉग, म्यानमार ३) महिला आरोपी ४) महिला आरोपी **आरोपी १ व २ अटक आहे.** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपीत हे सन २०१२ पासून आजपर्यत म्यानमार देशाचे नागरीक असुन कोणत्याही वैध प्रवासी कागदपत्रांशिवाय तसेच भारत म्यानमार सिमेवरील मुलकी आधिका-यांच्या लेखी परवानगी शिवाय घुसखोरीच्या मार्गाने भारतात प्रवेश करून तसेच त्यांचे कडे म्यानमार देशातून भारतात मध्ये प्रवेश करताना रेफ्युजी म्हणून कोणताही वैध दाखला नसताना देहूरोड पुणे येथे अवैधरित्या वास्तव्य करताना मिळुन आले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि भंडारे ९९२३८३३००७ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ३४३/२०२४ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२९, १३१ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२७/०७/२०२४ रोजी १४.२० वा चे सुमारास कॅफे टाईम येथे गंगानगर, से.नं. २८/३/३ प्राधीकरण निगडी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दिं.२७/०७/२०२४ रोजी २२.५२ वा |
| फिर्यादी | :- | उषा सुभाष दळे मपोहवा ब.नं. ५१९ नेमणुक गुन्हे शाखा युनिट-२, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय. |
| आरोपी | :- | चैतन्य सुभाष रेंगडे वय २३ वर्षे रा. संस्कृती दर्शन, केशवनगर वरुण हॉटेलजवळ कासारवाडी पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने त्याचेजवळ कुठलेही परवाने नसताना कॉफी शॉपचा बोर्ड लावून कुठलीही कॉफी हा पेय पदार्थ तसेच इतर कुठलेही खादय पदार्थ विक्री करण्यासाठी न ठेवता वरच्या मजल्यावर आतमध्ये अंधा-या खोलीत लाकडी प्लायवुडचे कपार्टमेंट बनवुन त्यास बाहेरुन पडदे लावून आतमध्ये सोफे ठेवुन मुलामुलींना बसण्यासाठी व अश्लिल चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा/१३५४ वीर ८८८८२९०५५५ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी ४६२/२०२४ भा.द.वि.कलम ४२०,४६५ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६(२) अन्वये |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २२/१२/२०२३ ते २५/०१/२०२४ दरम्यान मी माझे घरी क्षीतीज सोसायटी, आळंदी रोड भोसरी येथील फिर्यादी यांचे राहते घरी |
| गुन्हा दाखल | :- | दि. २७/०७/२०२४ रोजी १६.४२ वा. |
| फिर्यादी | :- | सुवर्णा स्वप्नील भोसले वय ३१ वर्षे व्यवसाय नोकरी (सिनेक्रॉन हिंजेवाडी) रा. जांबे, जय गणेश पार्क सहकारनगर ता. मुळशी जि. पुणे मो नं ७७०९२५९४३८ |
| आरोपी | :- | १) बंधन बॅक अकाउंट नं २०१०००१३६५८२६१ (IFSC CODE BDBL0002121), २) मारुती प्लास्टीक उद्योग या नावाने असलेले AU SMALL FINANCE अकाउंट क्र २३०२२१६७५४९६३८७० (IFSC CODE AUBL0002167) ३) मिस्टी फ्रेश येअर या नावाने असलेले AU SMALL FINANCE अकाउंट क्र २३०२२२१२५४१३७०९८ (IFSC CODE AUBL0002221) ४) शाईन कलेक्शन या नावाने असलेले PUNJAB NATIONAL BANK अकाउंट क्र ५२७६१०२१००००००८११ (IFSC CODE PUNB0527610) वापरणारा ५) अनोळखी इसम http://m.blockcoinak.com ही लिंक पाठवणारा |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी फिर्यादीस वॉट्स -अ‍ॅप ग्रुपमध्ये ऍड करुन शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतविण्यास सांगुन बंधन बॅक अकाउंट नं २०१०००१३६५८२६१ (IFSC CODE BDBL0002121), २मारुती प्लास्टीक उद्योग या नावाने असलेले AU SMALL FINANCE अकाउंट क्र २३०२२१६७५४९६३८७० (IFSC CODE AUBL0002167 मिस्टी फ्रेश येअर या नावाने असलेले AU SMALL FINANCE अकाउंट क्र २३०२२२१२५४१३७०९८ (IFSC CODE AUBL0002221) ४) शाईन कलेक्शन या नावाने असलेले PUNJAB NATIONAL BANK अकाउंट क्र ५२७६१०२१००००००८११ (IFSC CODE PUNB0527610) या अकाउंटवर फिर्यादीस पैसे जमा करण्यास सांगुन सदरच्या जमा रकमेवर नफ़ा दाखवुन तो काढुन घेण्यासाठी वॉट्स ॲप क्र ८७२३९५६४४८ वरुन एक लिंक पाठवली व ॲप अपडेट करण्यास सांगितले व एक http://m.blockcoinak.com ही लिंक दिली परंतु त्या लिंक वर गेल्यानंतर लॉग ईन होत नसलेबाबत कळविले असता त्यांनी टेक्निकल ईरर असल्याचे सांगितले व त्यानंतर मला रिप्लाय देणे बंद केले. नमुद आरोपी यांनी फिर्यादीस शेअर मार्केट मध्ये गुंतवणुक करुन परतावा देण्याचे आमीष दाखवुन फिर्यादीकडुन एकुण ३५,०००००/- (अक्षरी पस्तीस लाख रु) घेवुन आर्थिक फ़सवणुक केली आहे. तसेच सुरुवातीला गुंतवणुक केलेले रक्कम २,०००००/- (अक्षरी दोन लाख रु) सुद्धा फिर्यादी यांनी रिक्वेस्ट टाकल्याप्रमाणे दिनांक ११/०१/२०२४ रोजी अकाउंट नं ५०१००१०६४५१७३२ (IFSC CODE HDFC0000794) यावर जमा झाली. सदरची रक्कमसुद्धा कोणासोबत तरी फ़सवणुक करुन फिर्यादी यांचे अकाउंट नं ५०१००१०६४५१७३२ (IFSC CODE HDFC ००००७९४) व फिर्यादी यांचे आयसीआयसीआय चे अकाउंट नं ६४४६०१५०२७७६ यावर जमा केल्यामुळे अकाउंटची डेबीट फ्रिज झालेली आहे .अशा प्रकारे फिर्यादीची फ़सवणुक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि केंद्रे ७९७२०८५५५० |

११.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ५१८/२०२४ भारतीय न्याय संहीता १८९ (२), १८९(४), १९१(२),१९१(३),२९६,११०,११५(२), ११८(१),३(५) क्रिमीनल अमेंडमेंट ॲक्ट ३,७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. २७/०७/२०२४ रोजी सायंकाळी ०४/०० या. ते ०४/१५ वा. च्या सुमारास इंद्रायणी इलेक्ट्रीकल हार्डवेअर जवळ, मेदनकरवाडी येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि. २७/०७/२०२४ रोजी ०१.२४ वा. |
| फिर्यादी | :- | आदित्य कैलास शिंदे, वय १८ वर्षे, व्यवसाय शिक्षण, रा. मातोश्री निवास, सिध्दीविनायक नगर, चाकण, ता. खेड जि. पुणे मूळ गाव रा. अवसरी ता. आंबेगाव जि. पुणे, मो.क्र. ८८५६८३१२१६ |
| आरोपी | :- | १) श्रेयस कुसाळकर २) श्रीपाद कुसाळकर, ३) मिथून माने, ४) निखील शेलार, ५) महेश मोहन राज दोन अनोळखी इसम<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्याचा मित्र कृष्णा काशिनाथ संभोड व अजय असे त्यांचे मोटारसायकलवरुन जात असताना चार चाकी फॉर्च्यूनर गाडी क्रमांक एम.एच/१४ के.यु/२४९८ ही मेदनकरवाडीतून बालाजीनगर कडे जात असताना रस्त्यावरील पावसाचे साचलेले पाणी फिर्यादी यांचे अंगावर |

| | | |
|---|---|---|
| | | उडाले असता फिर्यादी यांने गाडी चालक आरोपी क्र १ यास अंगावर पाणी उडाले, गाडी हळू चालव असे बोलले असता त्याकारणावरुन आरोपी क्र १ याने फिर्यादी यास तू मला शिकवणार का गाडी कशी चालवायची असे बोलनु आरोपी क्र २ ते ५ व दोन अनोळखी इसम यांना सदर ठिकाणी बोलावुन घेवुन फिर्यादी व त्याचे मित्रास मारहाण शिवीगाळ करुन आरोपी क्र ३ याने त्याचे हातातील लोखंडी रॉड ने फिर्यादीचे डोक्यामध्ये वरील व पाठीमागील बाजुस जोरात मारले व आरोपी क्र ४ याने चामडयाचे पट्ट्याने पाठीवर मारहाण केली तसेच आरोपी क्र ४ याने फिर्यादीचा मित्र कृष्णा यास चामडयाचे पट्ट्याने मारहाण केली व आरोपी क्र १ व २ यांनी फिर्यादी व त्यांचे मित्रास लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ करुन तुम्ही पोलीस स्टेशनला गेला तर तुम्हाला मारून टाकू अशी धमकी दिली. आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि चौगुले ९९२१५२२१८५ |

१२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ४७४/२०२४ माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६ ड प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २७/०२/२०२४ रोजी ते दि १८/०४/२०२४ रोजीचे दरम्याण फ्लॅट नं. बी -१० बी ७०१- सारा सिटी खराबवाडी ता खेड जि पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दिं.२७/०७/२०२४ रोजी १९.४३ वा |
| फिर्यादी | :- | चिक्काबसप्पा रमेश बाबू झा ,वय ५८ वर्ष,व्यवसाय- खासगी नोकरी, रा.सध्या फ्लॅट नं. बी -१० बी ७०१- सारा सिटी खराबवाडी ता खेड जि पुणे मुळ रा. आर एच डी ०३ शिवगंगा युंनिवर्थ ट्रॅंगक्वील दोड्डाबेल्ले रोड बेंगलरु राज्य कर्नाटक - ५६००६० मो.क्र. ९४८०१२७४०२ |
| आरोपी | :- | टेलीग्रामवर वरील CBOE या टेलीग्राम प्लॅटफॉर्म |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील अनोळखी आरोपी यांनी फिर्यादी यांचे मो.क्र. ९४८०१२७४०२ या नबर वरुन टेलीग्रम वर सी ई रमेश बाबु या नावाने असलेल्या अकाऊंट वरुन VIP GOOGLE GLOBLE WORKING GRUP या टेलीग्रम ग्रुपवर ॲड झालेलो असताना CBOE या टेलीग्राम प्लॅटफॉर्मवरुन फिर्यादीस एक टास्क खेळण्यासाठी मेसेज आला होता. सदर मेसेजवर जावुन टास्क खेळण्यास सुरुवात केली असता. टास्क् खेळण्यापुर्वी त्यांनी दिलेल्या बँक खात्यावर फिर्यादी यांना टास्कची रक्कम भरण्यास सांगुन व टास्क पुर्ण होताच त्याचा स्क्रिनशॉर्ट काढुन PRIYANKA नावाने असलेल्या टेलीग्राम अकाऊंटवर वेळोवेळी पाठवुन. त्यानंतर टेलीग्रामवर CBOE या टेलीग्राम प्लॅटफॉर्मवर फायदा झाल्याचे सांगुन नविन टास्क खेळण्यास सांगुन फिर्यादी यांना दि १८/०४/२०२४ रोजी पर्यंत मी भरलेली रक्कम व फायदा झालेली रक्कम मिळुन २५,७६,४००/- रुपये नफा दर्शवुन फिर्यादीची एकुन १८,९६,०००/- रुपयाची फसवणुक केलेली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि शिंदे ७५०६९७४७९० |